# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्रमांक २४९/२०२४** **दिनांक-०१/०७/२०२४**

## "भारतीय न्याय संहिता-२०२३, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता- २०२३ व भारतीय साक्ष अधिनियम- २०२३ कायद्यांच्या जनजागृतीबाबत आयोजित कार्यक्रमाबाबत"

मा. शासनाकडून भारतीय दंड संहिता- १८६०, फौजदारी प्रक्रिया संहिता १८६० तसेच भारतीय पुरावा कायदा- १८७२ अशा कायद्यांमध्ये सुधारणा करुन नवीन कायद्याच्या निर्मीतीच्या कामाला प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर भारतीय न्याय संहिता- २०२३, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता- २०२३ व भारतीय साक्ष अधिनियम- २०२३ ही तीन विधेयके दोन्ही सभागृहात मंजुर होवून २५ डिसेंबर २०२३ रोजी मा. राष्ट्रपती यांची त्यावर स्वाक्षरी झाली. सदर तिन्ही कायद्याची अंमलबजावणी आज दिनांक १ जुलै २०२४ रोजीपासुन होत आहे.

**<u>जुन्या व नविन कायद्यातील कलमांचा तुलनात्मक तक्ता</u>**

| अ.क्र. | जुन्या कायद्यातील एकुण कलमे | नवीन कायद्यातील एकुण कलमे |
|---|---|---|
| १ | भारतीय दंड विधान ५११ कलमे | भारतीय न्याय संहिता ३५८ कलमे |
| २ | फौजदारी प्रक्रिया संहिता ४८४ कलमे | भारतीय नागरीक सुरक्षा संहिता ५३१ कलमे |
| ३ | भारतीय पुरावा कायदा १६७ कलमे | भारतीय साक्ष अधिनियम १७० कलमे |

सदर नविन कायद्याची दि. ०१/०७/२०२४ रोजीपासून अंमलबजावणी करण्यात आलेली असून सदर कायद्याची जन-जागृती होण्याकरीता तसेच सदर कायद्यांची माहीती ही सर्व सामान्य नागरीकांपर्यत पोहचावी याकरीता अनुशंगाने परिमंडळ-१ अधिनस्त पो.ठाणे काशिमीरा पोलीस ठाणे येथे दिनांक ०१.०७.०२०२४ रोजी दुपारी १२.०० वा. काशिमीरा पोलीस ठाणे येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून सदर कार्यक्रमाकरीता काशिमीरा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील वकील, डॉक्टर्स, इंजिनियर्स, शिक्षक, विदयार्थी, प्रतिष्ठित नागरिक, शांतता व मोहल्ला कमिटीचे सदस्य व इतर नागरिक उपस्थित राहणार आहेत. तसेच काशिगांव पोलीस ठाणे येथे दि. ०१.०७.२०२६ रोजी सायंकाळी १८.३० वा. मिरारोड पोलीस ठाणे येथे दि. ०१.०७.२०२६ रोजी सायंकाळी १७.०० वा नयानगर पोलीस ठाणे येथे दि. ०१.०७.२०२६ रोजी सायंकाळी १८.०० वा नवघर पोलीस ठाणे येथे दि. ०१.०७.२०२६ रोजी सायंकाळी १७.३० वा. भाईंदर

पोलीस ठाणे येथे दि. ०१.०७.२०२६ रोजी सायंकाळी १८.०० वा उत्तन सागरी पोलीस ठाणे येथे दि. ०१.०७.२०२६ रोजी सायंकाळी १६.०० वा पोलीस ठाण्यात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्याक्रमाकरीता पोलीस ठाणे हद्दीतील शांतता/मोहल्ला सदस्य, महिला दक्षता समिती सदस्य, प्रतिष्ठीत नागरीक यांची बैठक आयोजीत करण्यात आलेली आहे.

तसेच पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१ अधिनस्त पोलीस ठाण्यात करण्यात येणाऱ्या कार्यक्रम/बैठकीमध्ये नव्याने तयार करण्यात आलेल्या कायद्याची माहिती संबंधित पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिकारी व इतर अधिकारी हे मार्गदर्शन करणार आहेत. तसेच पोलीस ठाण्यातील बीट अधिकारी यांना त्यांच्या बीटमध्ये वेगवेगळया रहिवासी संकुल, सोसायटया, रहदारीचे चौक, ज्या ठिकाणी लोक फिरायला येतात अशा गार्डन्स या ठिकाणी भेट देवून तेथे लोकांना जमा करुन, त्यांना नवीन कायद्याची माहिती देवून, नवीन कायद्याबाबत जनजागृती करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे पोलीस ठाणे हद्दीतील शाळा, कॉलेजेस इत्यादी ठिकाणी भेट देवून, तेथील विद्यार्थ्यांना नवीन कायद्याची माहिती देण्याची व जनजागृती करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

---------00000---------